# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 05/10/2021 (मंगळवार)
(सकाळ)

---

### चोरी

1) पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 27 किमी. अंतरावरील हरदोली शेत शिवार येथे फिर्यादी नामे– कृष्णचंद झिबलजी कांबळे, वय 65 वर्षे, रा. हरदोली राजा व त्यांचे गावातील प्रणय कैलास ईटनकर यांचे शेतात दि. 4/10/2021 रोजी सकाळी 08.00 वा पुर्वी शेतातील मालाची चोरी झाली. त्यामध्ये फिर्यादी यांचे शेतातील घरातील गोडाउन मधील 14 सोल्याचे कट्टे किंमत 40,000/–रू. तसेच फवारणी करण्याचे फवारे किंमत 8,000/–रू. नाईलाईन चराट 500 रूपये 6 लोखंडी विळे किंमत 200/–रू. ईलेक्ट्रीक वायरचे बंडल किंमत 900/–रू. असा एकुण कि. 49,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास तपास पोलिस नाईक फरकाडे 7972328971 हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत दहेगाव येथे फिर्यादी नामे– चंद्रशेखर झिबल आंबिलडुके, वय 31 वर्ष, रा. दहेगाव ता मौदा यांची शेती ही दहेगाव शिवारात दोन एकर असून शेती मध्ये घर आहे. त्या घराच्या बाजुला फिर्यादीची ट्राली ठेवली असता दिनांक 03/10/2021 रोजी शेता मधुन कामे करून ते घरी आले तेव्हा शेताच्या बाजुला ट्राली उभी करून ठेवली. दिनांक 04/10/2021 राजी फिर्यादी हे सकाळी 06:00 वा शेतात मध्ये गाय,बैल घेवून गेले असता तेव्हा ट्राली त्यांना दिसुन आली नाही. अज्ञात आरोपीपीने फिर्यादीची हिरव्या रंगाची एमएच– 40/ सिए– 2181 क्रमांकाची ट्राली किमत 60,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास तपास पोलिस हवालदार यंगलवार मो.क्र. 9423219429 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर